मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३३२ सातारा सोमवार दि.२ सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत ५/-




## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर** : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सोमवार (२ सप्टेंबर) कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. यामुळे प्रशासनाची सध्या दौऱ्याच्या नियोजनासाठी धावपळ सुरू आहे. श्री अंबाबाई दर्शन, शासकीय विश्रामगृह, वारणानगर येथील नियोजित कार्यक्रमाच्या ठिकाणी रविवारपासूनच पोलिसांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच दौऱ्याची रंगीत तालीम व सुरक्षेचा आढावा उच्चस्तरीय सुरक्षा यंत्रणांकडून करण्यात येत आहे. या संपूर्ण दौरा काळात दोन हजारांवर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

श्री वारणा महिला सहकारी विविध उद्योग समुहाचा सुवर्ण सोहळा आणि वारणा विद्यापीठाचा उद्घाटन समारंभ निमित्ताने वारणा नगर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास भारताच्या राष्ट्रपती महामहीम द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती मुर्मू या उद्या सकाळी ११ वाजता कोल्हापूर विमानतळावर दाखल होणार आहेत. त्यानंतर अंबाबाईचे दर्शन घेणार असून त्या काही वेळ सर्किट हाऊस येथे थांबून पुढे कार्यक्रमासाठी वारणा कोडोली कडे प्रस्थान करणार आहेत. या दरम्यान पोलिसांनी या संपूर्ण मार्गावर व कार्यक्रमस्थळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला आहे.

शहरातील वाहतूकीत मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आले आहेत. त्याचबरोबर अंबाबाईच्या मंदिरात भाविकांची गैरसोय होऊ नये. यासाठी सर्वसामान्य नागरिकांना सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत देवीचे दर्शन बंद ठेवण्यात आले आहे. भाविकांनी सहकार्य करावे असे आवाहन देखील पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘जोडे मारा’ वरुन जुंपली

**मुंबई / नागपूर** : छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या दुर्घटनेवरून महायुती सरकारचा निषेध करण्यासाठी मुंबईत रविवारी महाविकास आकडीने (मविआ) 'जोडे मारा' आंदोलन केले. यावेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, कांग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारवर टीकेचा भडिमार केला. दुसरीकडे उपराजधानी नागपूरमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिदि आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनावरून मविआला लक्ष्य केले.

मविआच्या आंदोलनाला हुतात्मा चौकात सुरुवात झाली. जैकात फलकबाजीला बंदी असताना ठाकरे गटाच्या कार्यकत्यांनी एक फलक लावला. पोलिसांनी हस्तक्षेप केल्यानंतर प्रकरण निवळले. दुपारी साडेअकराच्या सुमारास हुतात्मा चौकातून मोर्चा गेट वे ऑफ इंडियाकडे निघाला. मोर्चाला परवानगी नसली तरी पोलिसांनी मज्जाव केला नाही. गेटवे ऑफ इंडिया येथील छत्रपती शिवाजी म जांच्या पुतळ्याचे दर्शन घेतल्यानंतर मकिआ नेत्यांनी जेडे मारा आंदोलन केले. यानंतर झालेल्या जाहीर सभेत विरोधकां- महायुती सरकार चले जाव' असा नारा दिला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे अनेक पुतळे आजही दिमाखात उभे आहेत. मात्र राजकोट किल्लावरील पुतळा उभारणीत भ्रष्टाचार झाल्याने तो पडला, अशा शब्दांत शरद पवार यांनी सरकारवर टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी माफी मागितली नसती तर, महाराष्ट्राने त्यांना शिल्लक ठेवले नसते. या महाराष्ट्रद्रोही सरकारला माता कहेरचा रस्ता दाखवा, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले. तर शिवद्रोही सरकार राज्यात पुन्हा येऊ देणार नाही, अशी महाराष्ट्रातील जनतेने शपथ घेतल्याचा दावा नाना पटोले यांनी केला. या आंदोलनात खा. छत्रपती शाहू महाराज, खा. सुप्रिया सुळे यांच्यासह मविआचे अनेक नेते सहभागी झाले होते. विशेष म्हणजे शरद पवार आणि छत्रपती शाहू महाराज प्रकृती बरी नसतानाही या आंदोलनासाठी आल्याचा उल्लेख पटोले यांनी आपल्या भाषणात केला.



## छत्रपतींच्या नावाने मतांसाठी राजकारण करणाऱ्यांचा जनताच कार्यक्रम करणार : मनोज जरांगे पाटील

सावंतवाडी : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मालवण राजकोट किल्ल्यावर भेट दिली. ते म्हणाले, ''छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राजकारण करणाऱ्यांचा जनताच कार्यक्रम करणार आहे, पुतळा दुर्घटनेतील दोषी पळून कसे जाऊ शकतात. राजकोट किल्ल्यावर टिकाऊ मोठे स्मारक उभारले पाहिजे.''

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज मराठा बांधवांसह मालवणमधील राजकोट किल्ल्यावर भेट देऊन शिवपुतळा दुर्घटनेची पाहणी केली. ''मी शिवरायांचा मावळा असून मी राजकोट येथे शिवपुतळा दुर्घटनेची पाहणी करण्यासाठी आलो आहे, मला या विषयावरून कोणतेही राजकारण करायचे नाही. शिवरायांचा पुतळा कोसळण्यावरुन विरोधक व सत्ताधारी यांनी राजकारण करू नये. पुतळा कोसळल्याचे त्यांना दु:खच झाले नाही, दु:ख असते तर राडा झाला नसता. छत्रपतींच्या नावाचा वापर केवळ सत्तेसाठी होत असून छत्रपतींच्या नावे राजकारण करणाऱ्यांचा जनताच कार्यक्रम करणार आहे, पुतळा दुर्घटनेतील दोषी पळून कसे जाऊ शकतात, त्यांना शोधून योग्य तो तपास झाला पाहिजे, दोषी व्यक्ती कोणत्याही मंर्त्याचा मित्र असू दे, तो पंतप्रधानांचा जरी मित्र असला तरी त्याला पकडून जेलमध्ये सडवला पाहिजे.'', असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.



तसेच राजकारण न करता राजकोट येथे शिवरायांचे प्रचंड मोठे असे आणि टिकाऊ स्मारक उभे राहिले पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

## आरोपी अक्षय शिंदेची चिमुकल्यांसमोर ओळख परेड

**ठाणे** : काही दिवसांपूर्वी बदलापूरमधून एक संतापजनक घटना समोर आली होती. एका शाळेतील सफाई कर्मचाऱ्यानं दोन चिमुकल्यांवर अत्याचार केला होता. अक्षय शिंदे असं या प्रकरणातील आरोपीचं नाव आहे, या घटनेनंतर बदलापूरकरांनी चांगलाच संताप व्यक्त केला, नागरिक रस्त्यावर उतरले. रेलरोको करण्यात आला. तर पोलिसांनी देखील या प्रकरणातील काही आंदोलकांवर गुन्हा दाखल केला आहे. आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. ती म्हणजे बदलापूर प्रकरणात पीडित चिमुकल्यांसमोर आरोपीची ओळख परेड करण्यात आली आहे.

बदलापूर प्रकरणात पीडित चिमुकल्यांसमोर आरोपीची ओळख परेड करण्यात आली आहे. या प्रकरणातील पीडित चिमुकल्यांनी आरोपी अक्षय शिंदेला ओळखलं आहे. शनिवारी कल्याण कोर्टामध्ये आरोपीची ओळख परेड करण्यात आली. चिमुकल्यांनी आरोपी अक्षय शिंदे याला ओळखल्यामुळे पोलिसांच्या हाती या प्रकरणात आता मोठा पुरावा लागला आहे.

दरम्यान दुसरीकडे अक्षय शिंदे हा मानसिक दृष्ट्या फीट नसल्याचा दावा त्याच्या आईकडून करण्यात आला होता. मात्र अक्षय मानसिक दृष्ट्या फिट असल्याचा मोठा पुरावा समोर आला आहे. एसआयटीनं अक्षयची पहिली पत्नी शोधून काढली आहे, त्याच्या पहिल्या पत्नीनं धक्कादायक खुलासे केले आहेत.त्याच्या पहिल्या पत्नीने अक्षयवर लैंगिक अत्याचाराचे आरोप केले आहेत. अक्षय शारिरीक संबंधांबाबत विकृत असल्याचं त्याच्या पहिल्या पत्नीनं म्हटलं आहे. अक्षय शारीरिक संबंधाबाबत खूप आक्रमक असायचा असंही तीने म्हटलं आहे. त्यामुळे अक्षय मानसिक दृष्ट्या फीट असल्याचा मोठा पुरावा आता पोलिसांच्या हाती लागला आहे.

## आमदार चेतन तुपे यांना ‘उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार’ जाहीर



**पुणे** : हडपसर विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार चेतन तुपे यांना यंदाचा ‘उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार’ जाहीर झाला आहे. महाराष्ट्र विधानमंडळातील राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते येत्या मंगळवारी (३ सप्टेंबरला) या पुरस्काराचे वितरण होणार असून मुंबई विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात हा कार्यक्रम पार पडेल. २० वर्षांपूर्वी दिवंगत मंत्री गिरीश बापट यांना हा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर पुण्याचे उपनगर अशी ओळख असलेल्या हडपसर विधानसभा मतदारसंघातून निवडून येऊन पहिलाच ट्रम्प हा पुरस्कार मिळविणारे चेतन तुपे हे पहिलेच आमदार ठरले आहेत.

विधिमंडळाच्या कामकाजातील नियमित सहभाग, संसदीय परंपरा, शिष्टाचार यांची जाण, विधिमंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन, उपस्थिती, विधिमंडळात प्रश्न, विषय मांडताना वापरलेले कौशल्य, वक्तृत्व शैली, संसदीय भाषणे या सगळ्या बाबी पडताळून या पुरस्कारांसाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीकडून संबधित आमदाराची यासाठी शिफारस केली जाते. त्यानंतर राष्ट्रकुल संसदीय मंडळाकडून हे पुरस्कार जाहीर केले जातात. यापूर्वी हा पुरस्कार दिवंगत गृहमंत्री आर आर पाटील, विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, रोहिदास पाटील, अरुण गुजराथी यांना देण्यात आलेला आहे.

## ऊस दराचा लढा दिल्ली उच्च न्यायालयात; सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**कोल्हापूर** : ऊसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर मिळावा यासाठी जय शिवराय किसान संघटनेचे अध्यक्ष शिवाजी माने यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेबाबत न्या. दिपंकर दत्ता आणि न्या. प्रशांत मिश्रा यांच्या खंडपीठाने शनिवारी ऊस दराच्या प्रश्नाबाबत संविधानाच्या २२६ अनुच्छेदानुसार दिल्ली उच्च न्यायालयात जाण्याचे आदेश दिले.

साखर उतारा प्रारूप वेळोवेळी बदलल्याने शेतकऱ्यांचे प्रति टन १५०० रुपये नुकसान झाले आहे. तसेच, मागील पाच वर्षांमध्ये उसाचा उत्पादन खर्च ७० टक्के वाढला आहे. याचा विचार केंद्र सरकारने ऊसाचा रास्त दर (एफआरपी) ठरवत असताना केला नाही. एफआरपी वाढते त्यावेळी परत ऊस



तोडणी आणि वाहतुकीमध्ये वाढ होत असते. हा खर्च एफआरपीमधून वजा करूनच शेतकऱ्यांना ऊस बिले दिली जातात. त्यामुळे वाढलेल्या एफआरपीचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळत नाही, असे मुद्दे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले होते.

यामध्ये प्रतिवादी म्हणून भारत सरकार, केंद्रीय कृषी मूल्य आयोग, केंद्रीय सहकार मंत्रालय, महाराष्ट्र शासन, साखर आयुक्त यांना केले होते. यातील तीन प्रतिवादी हे दिल्ली स्थित असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयात जाण्याची आदेश दिले आहेत.

## पुढील ३ महिन्यात धावणार वंदे भारत स्लीपर

**बंगळुरू** : देशातील सर्वात हायस्पीड वंदे भारत ट्रेनने नुतकेच शतक पूर्ण केले असून प्रवाशांनाही या ट्रेनची भुरळ पडली आहे. देशातील लांब पल्ल्याच्या विविध मार्गावर ही ट्रेन सुरू झाल्यानंतर प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद या ट्रेनला मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवार ३१ ऑगस्ट रोजी देशातील आणखी ३ नवीन वंदे भारत ट्रेनना हिरवा झेंडा दाखवला. त्यामुळे, देशातील वंदे भारत ट्रेनची संख्या आता शतकेपार गेली आहे. मोदींच्याहस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरू झालेल्या या नवीन तीन ट्रेन चेन्नई ते नागरकोइल, मदुराई ते बेंगळुरू आणि मेरठ ते लखनौ या मार्गावर धावणार आहेत. विशेष म्हणजे दुसऱ्याच दिवशी वंदे भारतसंदर्भात आणखी एक गुडन्यूज समोर आली आहे. बंगळुरू येथील वंदे भारत ट्रेन तयार होणाऱ्या कंपनीत वंदे भारत स्लीपर ट्रेनची चाचणी करण्यात येत आहे. वंदे भारत ट्रेनचा सुरू असलेला पल्ला वाढत असून देशभरात आता १०२ वंदे भारत ट्रेन धावत आहेत.



## पवारांचा कोणता पैलवान बारामतीची गदा जिंकणार?

**बारामती** : २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बारामती लोकसभा मतदारसंघाची चर्चा होती. आता पुन्हा एकदा बारामती विधानसभेची निवडणूक राज्यभर चर्चेत राहणार आहे. आणि या चर्चांना आतापासूनच सुरवात झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने युगेंद्र पवार यांना निवडणूक रिंगणात उतरवण्याची तयारी सुरू आहे. दुसरीकडे अजित पवार अचानक जय पवार यांना निवडणूक रिंगणात उतरवणार असेही बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर श्रावणातील शेवटच्या शनिवारी दरवर्षी होणारी कन्हेरी येथील मारुतीरायाची यात्रा यादृष्टीने चर्चेत आली. या यात्रेच्या कुस्ती मैदानात एकाच वेळी जय पवार आणि युगेंद्र पवार समोरासमोर आले. अर्थात दोघेही समोरासमोर आले आणि दोघांनीही एकमेकांची गळाभेट घेतली. कन्हेरीकरांनी मात्र एकाच वेळी दोघांच्या हातात चांदीची गदा दिली. चांदीची गदा हातात घेताना दोघांचे एकत्र फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले.त्यामुळे आता खरोखरच जय पवार आणि युगेंद्र पवार यांच्यातच लढत झाली. तर तालुक्यातील राजकीय गदा कोण घेणार? रंगीत तालमीचा भाग नव्हता ना? अशी देखील चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे.

दोन्ही भावांनी घेतली गळाभेट

सख्खे चुलतभाऊ जय आणि युगेंद्र पवार यांनी कोणतीही कटुता नसल्याचे देखील उपस्थितांना दाखवून दिले. त्यामुळे कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या अंगावर जाण्याची आवश्यकता नाही. असा देखील संदेश यानिमित्ताने उपस्थितांना मिळाला. जय पवार आणि युगेंद्र पवार समोरासमोर आले. त्यांनी एकमेकांची गळाभेट घेतली आणि ते एकत्र त्यांनी संवाद देखील साधला.

## तुतारी वाजवायला किती वेळ लागतोय

### रामराजे नाईक-निंबाळकरांचा अजित पवारांना इशारा

**सातारा** : फलटणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पक्षातील वरिष्ठ नेते व माजी मंत्री रामराजे नाईक निंबाळकर हाती तुतारी (राष्ट्रवाद च्या शरद पवार गटाचं निवडणूक चिन्ह) घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रामराजे नाईक निंबाळकर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख व ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या संपर्कात असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगत होत्या. त्यातच आता रामराजे निंबाळकर यांनी केलेल्या एका सूचक वक्तव्यामुळे फलटणच्या राजकारणात उलथापालक सुरू झाली आहे. रामराजे नाईक निंबाळकरांनी अप्रत्यक्षपणे पक्षाचे प्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना इशारा दिला आहे.

रामराजे नाईक निंबाळकर यांनी अनेकदा माजी खासदार रणजीत नाईक निंबाळकर व भाजपा नेते जयकुमार गोरे यांच्याविरोधातील नाराजी व्यक्त केली आहे. तसेच त्यांनी या दोन्ही नेत्यांची पक्षातील वरिष्ठांकडे तक्रार देखील केली आहे. वरिष्ठांनी या तक्रारीची दखल न घेतल्यास पुढील काळात हाती तुतारी घेऊ, असं रामराजे नाईक निंबाळकर यांनी म्हटलं आहे.

रामराजे यांनी काही वेळापूर्वी फलटण येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी ते कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, तीन महिन्यांपूर्वी तुम्ही तुतारीची चर्चा सुरू केली, मी त्यावर काही प्रतिक्रिया दिली नाही. मात्र यांची (रणजीत नाईक निंबाळकर व त्यांचे साथीदार) दहशत रोखली पाहिजे. आपलं भारतीय जनता पार्टीशी कोणत्याही प्रकारचं भांडण नाही. आपण हिंदू-मुस्लिम वाद करत नाही, कोणी गाय मारली तर आपण त्याला संरक्षण देत नाही. आपली तक्रार एकच आहे, रणजीत सिंह नाईक निंबाळकर व त्यांच्या साथीदारांनी फलटणमधल्या गल्लोगल्ली जी दहशत निर्माण केली आहे, त्यांचे जे प्रकार चालू आहेत, त्याविरोधात आपण तक्रार केली आहे. त्यावर वरिष्ठांनी कारवाई करावी.

तर आपल्याला तुतारी वाजवायला किती वेळ लागतोय, रामराजे नाईक निंबाळकरांचं सूचक वक्तव्य

रामराजे म्हणाले, आमचं एवढंच म्हणणं आहे की रणजीत निंबाळकर व त्यांच्या साथीदारांच्या दहशतीला भारतीय जनता पार्टीने सत्तेतून साथ देऊ नये. आपली एवढीच तक्रार आहे. ही तक्रार आपण वरिष्ठांना सांगून बघू. तुम्ही सर्वजण माझ्याबरोबर तयारीने या. महिलांनी देखील यायला हवं. आपण वरिष्ठांशी चर्चा करू. एक तास वेगळा कार्यक्रम घेऊ आणि हा विषय संपवून टाकू. आपल्या तक्रारीची दखल घेतली नाही, आपल्या तक्रारीमुळे कोणताही फरक पडला नाही तर आपल्याला तुतारी वाजवायला किती वेळ लागतोय. अजून काही बोलायचं बाकी राहिलं आहे का?




# विषमतेची वाढती दरी

**भारतात एकीकडे अब्जाधीशांची संख्या वाढते आहे, तर दुसरीकडे तेवढ्याच वेगाने गरिबांची संख्याही वाढते आहे. देशातील एक टक्का गर्भश्रीमंतांना संपत्तीमुळे अजीर्ण होत असताना दुसरीकडे ७४ टक्के लोकांना पुरेसे दोन वेळचे अन्न आणि न्याहारी मिळत नाही. केंद्र सरकार ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य देण्याची बढाई मारते आणि त्याच वेळी २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या बाहेर काढल्याचा दावा करते, ही परस्परविरोधी बाब आहे.**

एकीकडे सरकारी कर्मचाऱ्यांचा किमान पगार आता ३८ हजार तर जास्तीत जास्त पगार दरमहा साडेचार लाख रुपये होणार असताना दुसरीकडे असंघटित क्षेत्रातील बहुतांश कामगारांना वीस हजार रुपयांच्या आत पगार असल्याचे विदारक चित्र गेल्या आठवड्यात पुढे आले. वाढती महागाई, शिक्षण, वैद्यकीय खर्चात होणारी वाढ लक्षात घेता सध्या असलेला पगार पुरेसा नाही, हे वास्तव असताना त्याकडे मात्र नियोजनकर्त्यांचे लक्ष नाही. भारत महासत्ता झाला, तरी त्यामुळे मध्यमवर्गाच्या खाली असलेल्या घटकाच्या राहणीमानात आणि जीवनमानात काही फारसा फरक पडत नाही. शिक्षण हा मूलभूत अधिकार असला, तरी खरेच प्रत्येकाला मनाप्रमाणे शिक्षण घेता येते का, हा प्रश्नच आहे. भारताची दोन चित्रे आहेत. एका बाजूला गरीब आणि मध्यमवर्गीय लोक आहेत. दुसऱ्या बाजूला श्रीमंत आणि अब्जाधीश लोक आहेत. देशात ज्या गतीने श्रीमंत आणि त्यांची संपत्ती वाढत आहे, त्या गतीने सामान्य माणसाची संपत्ती वाढत नाही. 'हुरुन इंडिया रिच लिस्ट'मध्ये पहिल्यांदाच १५०० हून अधिक श्रीमंतांचा समावेश करण्यात आला आहे. ही संख्या ७ वर्षांपूर्वीच्या तुलनेत दीडशे टक्के जास्त आहे. भारतातील अब्जाधीशांची संख्याही ३०० च्या वर पोहोचली आहे. १३ वर्षांत अब्जाधीशांची संख्या सहापट वाढली आहे. २०२४ च्या 'हुरुन इंडिया रिच लिस्ट'मध्ये गौतम अदानी पहिल्या स्थानावर आहेत. ९५ टक्क्यांच्या वाढीसह गौतम अदानी आणि त्यांच्या कुटुंबाची एकूण संपत्ती ११.६ लाख कोटी रुपये झाली आहे. अहवालानुसार, १५३९ लोकांची संपत्ती १००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. यामध्ये २७२ नवीन लोकांचा समावेश आहे. यानुसार गेल्या वर्षी देशात दर पाचव्या दिवशी एक नवा अब्जाधीश निर्माण झाला. गरिबांची संख्या कमी होण्याचा वेग कमी आहे. भारतात श्रीमंतांची संख्या झपाट्याने वाढली आहे; परंतु गरिबांची संख्या हळूहळू कमी होत आहे. 'डेटा थिंक प्राईस' अहवालात असे दिसून आले आहे, की गेल्या सात वर्षांत भारतातील श्रीमंतांची संख्या पाचशे टक्क्यांनी वाढली आहे, तर गरीबांची संख्या केवळ ५८ टक्क्यांनी कमी झाली आहे. उच्च उत्पन्न गटाची लोकसंख्या २०१६ मध्ये १०.१ टक्क्यांवरून २०२३ मध्ये १४.७ टक्क्यांपर्यंत वाढली. कोविड नंतर, ६४.९ कोटींच्या तुलनेत २०२०-२१ मध्ये कनिष्ठ आणि मध्यमवर्गाची लोकसंख्या ९७.३ कोटी झाली; परंतु २०१६ च्या तुलनेत ती ९.३ कोटी कमी होती. यावरून भारतात आर्थिक विषमता वाढत असल्याचे दिसून येते.

भारतात अब्जाधीश वाढले; पण निम्न आणि मध्यम वर्गाची काय स्थिती आहे? 'होम क्रेडिट इंडिया कंपनी'ने नुकताच 'द ग्रेट इंडियन वॉलेट स्टडी' नावाचा सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात सामान्य माणूस किती कमावतो आणि कुठे खर्च करतो हे सांगते. भारतातील मध्यमवर्गीयांचे उत्पन्न वाढत आहे; पण त्याचवेळी महागाईही वाढत असल्याचे या सर्वेक्षणातून समोर आले आहे. २०२४ मध्ये महानगरांमधील सामान्य लोकांचे मासिक उत्पन्न केवळ ३५ हजार रुपये आहे, तर टियर-१ आणि टियर-२ शहरांमध्ये ही कमाई ३२ हजार रुपये आहे. २०२३ मध्ये, महानगरांमधील सामान्य लोकांचे सरासरी उत्पन्न ३३ हजार रुपये होते.

टियर-१ शहरांमध्ये त्यांचे उत्पन्न ३०,००० रुपये आणि टियर-२ शहरांमध्ये त्यांचे उत्पन्न २७,००० रुपये होते; मात्र उत्पन्न वाढल्याने खर्चही वाढला आहे. खर्चातही सरासरी सह टक्के वाढ झाली आहे. किराणा सामान (२६%) आणि भाडे (२१%) यांसारखे खर्च सर्वात जास्त योगदान देतात. त्यानंतर वाहतूक (१९%), शिक्षण (१५%) आणि वैद्यकीय बिले (७%)यांचा समावेश होतो. २०२४ मध्ये निम्न-मध्यमवर्गीय लोकांचे मासिक उत्पन्न सुमारे ३३ हजार रुपये आहे, तर मासिक खर्च १९ हजार रुपये आहे. चेन्नईमध्ये लोक सर्वाधिक भाडे देतात. कोलकाता आणि जयपूरमध्ये भाडे सर्वात कमी आहे. चेन्नईचे लोक आपला बहुतेक पैसा मौजमजेवर खर्च करतात. लखनऊचे लोक या बाबतीत सर्वात कंजूष निघाले. प्रवास करणे, बाहेर खाणे आणि चित्रपट पाहणे यावर ते कमीत कमी खर्च करतात. डेहराडूनचे लोक वैद्यकीय उपचारांवर सर्वाधिक पैसा खर्च करतात; पण तेच लोक मुलांच्या शिक्षणावर कमीत कमी खर्च करतात. केवळ एक-दोन नव्हे, तर टॉप २० क्षेत्रात सर्वत्र श्रीमंत आणि अब्जाधीशांची संख्या वाढली आहे. यामध्ये जुने कौटुंबिक व्यावसायिक, स्टार्टअप संस्थापक, प्रायव्हेट इक्विटी गुंतवणूकदार, देवदूत गुंतवणूकदार, नवीन पिढीचे नेते, चित्रपट तारे आणि बरेच लोक प्रगती करत आहेत. चीनमधील अब्जाधीशांची संख्या २५ टक्क्यांनी कमी झाली असताना भारतात ती २९ टक्क्यांनी वाढली आहे. आता आपल्याकडे विक्रमी ३३४ अब्जाधीश आहेत. या यादीतील जवळपास ७० टक्के लोक असे आहेत, ज्यांची एकूण संपत्ती १.५ ट्रिलियन डॉलर आहे. ही इतकी मोठी रक्कम आहे की ती भारताच्या जीडीपीच्या एक तृतीयांश आहे. आता हा पैसा हळूहळू पुढच्या पिढीच्या हातात जात आहे. याचा अर्थ नवीन लोक, नवीन उद्योजक आणि सक्षम व्यवस्थापक आता पैसे कमावण्याच्या शर्यतीत उतरू लागले आहेत.

भारताची अर्थव्यवस्था किती वेगाने बदलत आहे हे या बदलावरून दिसून येते. या यादीतील ६५ टक्के लोक असे आहेत, ज्यांनी उद्योजकतेची सुरुवात स्वतःपासून केली आणि श्रीमंत झाले. पाच वर्षांपूर्वी हा आकडा ५४ टक्के होता. याचा अर्थ आता अधिक लोक आता स्वतःच्या श्रीमंतीत भर घालीत आहेत. या वर्षी यादीत आलेल्या ६४ टक्के लोकांनी शून्यातून सुरुवात करून अब्जाधीश झाले. एवढेच नाही, तर काही लोक पहिल्या पिढीतच श्रीमंत झाले आहेत.

त्यात त्यांचे योगदान मोठे आहे. या यादीत एकूण संपत्तीपैकी ५७ टक्के संपत्ती या लोकांची आहे, ज्यांनी स्वतः शून्यातून सुरुवात केली आहे. भारताचे उत्पादन क्षेत्र खूप वेगाने वाढत आहे. या वर्षी १०१६ मॅन्युफॅक्चरिंग युनीट 'हुरून रिच लिस्ट'मध्ये समाविष्ट झाली असून अशा लोकांच्या संपत्तीत २८ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे. 'हुरुन इंडिया रिच लिस्ट'मध्ये समाविष्ट लोकांची एकूण संपत्ती १५९ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. ती सौदी अरेबिया आणि स्वित्झर्लंडच्या एकत्रित जीडीपीपेक्षा मोठे आहे. ते भारताच्या जीडीपीच्या निम्म्याहून अधिक आहे. १३३४ अब्जाधीशांनी आपली संपत्ती वाढवली आहे. याशिवाय २७२ नवीन चेहरे या यादीत सामील झाले आहेत; मात्र २०५ लोकांची संपत्तीही कमी झाली आहे. या यादीतून ४५ लोक वगळले आणि ५ जणांचा मृत्यू झाला. २०२४ च्या 'हुरुन इंडिया रिच लिस्ट'मध्ये ३८६ अब्जाधीशांसह मुंबई अव्वल स्थानावर आहे. यानंतर दिल्लीत २१७ आणि हैदराबादमध्ये १०४ अब्जाधीश आहेत. या वर्षी मुंबईतून ६६ नवीन लोक सामील झाले. 'एचसीएल'च्या शेअरच्या किमतीत ५० टक्के वाढ झाल्यानंतर ७९ वर्षीय शिव नाडर ३.१ लाख कोटींच्या संपत्तीसह तिसऱ्या स्थानावर पोहोचले. १,२०० कोटी रुपयांच्या संपत्तीसह ४५ वर्षीय आनंद चंद्रशेखरन हे २०२४ च्या 'हुरुन इंडिया रिच लिस्ट'मध्ये पदार्पण करणारे पहिले देवदूत गुंतवणूकदार आहेत. यादीतील सर्वात तरुण अब्जाधीश हर्षिल माथूर आणि शशांक कुमार आहेत. सर्वात तरुण २१ वर्षांचे कैवल्य वोहरा आहेत, ते 'झेप्टो' स्टार्टअपचे संस्थापक आहे. दुसऱ्या क्रमांकावर याच कंपनीचे सह-संस्थापक आदित पालीचा आहेत. 'एनआरबी बिअरींग' कंपनीच्या हनवंतबीर कौर साहनी यांनी वयाच्या ९५ व्या वर्षी 'हुरुन इंडिया रिच लिस्ट' मध्ये पदार्पण केले. २०२४ च्या 'हुरुन इंडिया रिच लिस्ट'मध्ये १०२ अनिवासी भारतीय आहेत. अनिवासी भारतीयांसाठी अमेरिका सर्वाधिक पसंतीचा देश आहे. यानंतर संयुक्त अरब अमिराती आणि ब्रिटनचा क्रमांक लागतो. गोपीचंद हिंदुजा आणि त्यांचे कुटुंब एक लाख ९२ हजार ७०० कोटी रुपयांच्या संपत्तीसह सर्वात श्रीमंत अनिवासी भारतीय आहेत. एक लाख साठ हजार ९०० कोटी रुपयांच्या मालमत्तेसह, एलएन मित्तल आणि त्यांचे कुटुंब ब्रिटनमध्ये राहणारे सर्वात श्रीमंत अनिवासी भारतीय आहेत. त्याचवेळी अनेक भारतीयांना राहायला घर, प्यायला चांगले पाणी, दोन वेळचे पोषक भोजन मिळण्याची मारामार आहे.

# कोयना नदीवर उभारण्यात येणारे जलपर्यटन केंद्र लवकर सुरू करा : शंभूराज देसाई

**सातारा :** कोयना नदी पात्रातील रासाटी ते हेळवाक या दरम्यान पर्यटकांसाठी जल पर्यटन केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्रामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत. हे जल पर्यटन केंद्र लवकर सुरू होण्यासाठी संबंधित विभागांनी गतीने कार्यवाही करावी, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.



चेंबरी तालुका पाटण येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, तहसीलदार अनंत गुरव, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे, कार्यकारी अभियंता निलेश पोदार, सहाय्यक अभियंता सागर आदी उपस्थित होते.


पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, या जल पर्यटनासाठी शासनाने निधी मंजूर केला आहे. येथील कामांच्या निविदा तात्काळ काढाव्यात. या जल पर्यटन अंतर्गत पर्यटकांसाठी विविध प्रकारच्या बोटी घेण्यात येणार आहेत या बोटी चालवण्याचे प्रशिक्षण स्थानिकांना द्यावे. जल पर्यटना अंतर्गत मंजूर झालेल्या पायाभूत सुविधांची दर्जेदारपणे कामे करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

जल पर्यटनासाठी अडथळा ठरणाऱ्या बाबी तात्काळ दूर कराव्यात, अशा सूचना करून पालकमंत्री श्री देसाई यांनी जल पर्यटनाच्या आराखड्याचा सविस्तर आढावा घेतला.

बैठकीनंतर पालकमंत्री श्री. देसाई यांनी कोयनानगर येथे उभारण्यात येणाऱ्या पोलीस वासाहत जागेची व जल पर्यटन केंद्रांच्या जागेची पाहणी केली.

# शक्तिपीठ मार्गावरून महायुती सरकारच्या संदिग्ध भूमिकेने वाद

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्यांना विचारात घेऊन केला जाईल**



**कोल्हापूर :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोल्हापूर दौऱ्यात शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्यांना विचारात घेऊन केला जाईल, असे विधान केले. त्यानंतर याच आठवड्यात राज्य शासनाने लॉजिस्टिक धोरण जाहीर करताना शक्तिपीठ महामार्ग राबवण्याचा निर्धार व्यक्त केला असल्याने पुन्हा वादाचे पडसाद उमटू लागले आहेत. हा प्रकल्प रद्द केला पाहिजे अशी मागणी विधान परिषदेत गटनेते सतेज पाटील यांनी केली आहे. यामुळे या प्रकल्पाचे पुढे नेमके काय होणार याचा पेच निर्माण झाला आहे.

राज्यातील प्रमुख अध्यात्मिक केंद्रे, देवस्थाने यांना जोडणारा नागपूर ते गोवा असा १२ जिल्ह्यातून जाणारा शक्तिपीठ महामार्ग राबवण्याचे राज्य शासनाचे नियोजन आहे. नागपूर ते गोवा हे अंतर दहा तासांनी कमी होणार आहे. संबंधित जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून या प्रकल्पाला विरोध होत असून त्याची तीव्रता वाढत असल्याचे वेगवेगळ्या आंदोलनातून दिसून आले आहे.

हा प्रकल्प राजकीय परिणाम घडवणारा ठरू लागला आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी याची चुणूक दिसून आली होती. शक्तीपीठ महामार्गावरील महायुतीच्या अनेक उमेदवारांना फटका बसला होता. महाविकास आघाडीला त्याचा राजकीय फायदा झाला होता. यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शक्तिपीठ महामार्गाची विरोधाची धार कमी करण्याचा महायुतीच्या नेत्यांचा प्रयत्न दिसत आहे. हा प्रकल्प रद्द करावा अशी मागणी पालकमंत्री कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी लोकसभा निवडणुकीनंतर लावून धरली आहे.

## उद्धव ठाकरेंची मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांवर टीका!

**मुंबई :** मालवण येथील राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी झालेल्या जाहीर सभेत उद्धव ठाकरे यांनी सरकारवर ताशेरे ओढले. चुकीला माफी नाही असं म्हणत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली.

''माझ्यासाठी तसेच माझ्या सहकाऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ नाव नसून ते आमचे आराध्यदैवत आहेत. त्यामुळे सिंधुदुर्गमध्ये जे घडले त्याबद्दल मी शिवछत्रपतींच्या चरणी नतमस्तक होऊ माफी मागतो'', अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घडलेल्या प्रकाराबाबत पालघर येथील कार्यक्रमात शुक्रवारी माफी मागितली होती. यावरूनच उद्धव ठाकरे यांनी मोदींवर टीकास्त्र डागलं.

''सत्ताधारी आमच्यावर टीका करत आहेत की आम्ही राजकारण करत आहोत. पण ते राजकारण करत नसून गजकर्ण आहे. शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे नेहमी म्हणायचे की हल्ली राजकारण म्हणजे गजकर्ण झालंय. खाजवत बसत आहेत. पण या चुकीला माफी नाही. आणि मुद्दाम हून मनातील संताप व्यक्त करण्यासाठी गेट वे ऑफ इंडिया म्हणजे देशाचं प्रवेशद्वार येथे जमलो आहे. हे शिवद्रोही सरकारला बेकायदा सरकारला गेट आऊट ऑफ इंडिया करण्यासाठी आम्ही इथे जमलो आहेत'', असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# राजकोट पुतळा कोसळल्याचे खरे सूत्रधार फडणवीसच : संजय राऊत

**मुंबई :** राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर राज्यातील राजकारण जास्त तापल्याचं पाहायला मिळालं आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुतीचे नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसत आहेत. आज राजकोट किल्ल्यावरील पुतळा कोसळल्या प्रकरणी महाविकास आघाडी आक्रमक झाली आहे.

महाविकास आघाडीचे समर्थक, कार्यकर्ते आज मुंबईसह इतर ठिकाणी आंदोलन करत आहे. आंदोलनकर्त्यांची अडवणूक केली जात आहे. लोकशाहीत असं होत नाही असं म्हणत खासदार संजय राऊत यांनी फडणवीसांना टार्गेट करत तिखट स्वरात प्रश्न उपस्थित केले आहेत. यावेळी त्यांनी फडणवीसांवर जोरदार टीका केली.

मालवण पुतळा प्रकरणी मविआ आक्रमक झाले आहेत. महाविकास आघाडीचं आज जोडेमारो आंदोलन करण्यात येणार आहेत. हुतात्मा चौक ते गेटवेपर्यंत आंदोलन असेल. या भागात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मोर्चाला अद्याप पोलिसांकडून परवानगी नाही तरीही आंदोलनावर कार्यकर्ते ठाम आहेत.

मालवणमधील घटनेच्या निषेधार्थ आंदोलन केलं जाणार आहे. यात भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. गेटवे ऑफ इंडिया परिसरात आंदोलन केलं जाईल. मोर्चाला अजूनही पोलिसांकडून परवानगी नाही, मविआचे मोठे नेते आंदोलनात उतरणार का याकडे सर्वांचं लक्ष आहे.

# मविआचं 'जोडे मारो' आंदोलन

**नागपूर :** मालवणमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा काही दिवसांपूर्वी कोसळला. याचा निषेध करण्यासाठी आज महाविकास आघाडीकडून मुंबईत आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाला हुतात्मा चौक येथून सुरुवात होणार आहे. या आंदोलनामध्ये काँग्रेस तसेच शिवसेना ठाकरे गटाचे नेते सहभागी होणार आहेत. गेट वे ऑफ इंडिया येथे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे संबोधित करणार आहेत. दरम्यान या आंदोलनावरून भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी आणि काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

नेमकं काय म्हणाले फडणवीस?

'हे पूर्ण शुद्ध पद्धतीने राजकीय आंदोलन आहे. महाविकास आघाडीला माझा सवाल आहे की त्यांनी लाल किल्ल्याहून छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव घेतलं असे इंदिरा गांधी यांचं एक तरी भाषण दाखवाव, पंडित नेहरू यांनी त्यांच्या डिस्कवरी ऑफ इंडियामध्ये जे लिहिलं त्याबद्दल महाविकास आघाडी माफी मागणार आहे का? इतके वर्ष काँग्रेसने महाराजांनी सुरत लुटलं असा इतिहास शिकवला, शिवाजी महाराजांनी कधीच सुरत लुटलं नव्हतं, मात्र जाणीवपूर्वक आम्हाला इतिहास शिकवण्यात आला त्याबद्दल ते माफी मागणार का?

मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसचं सरकार असताना कमलनाथ यांच्या मतदारसंघात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बुलडोजरने हटवण्याच पाप काँग्रेसने केलं महाविकास आघाडी त्याची माफी मागणार का? कर्नाटकमध्येही तेच घडलं. महाविकास आघाडी ही केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अशा प्रकारचं आंदोलन करत असल्याचं' फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याची ऊंची वाढवा

## मनसेकडून मागणी

**रत्नागिरी :** मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली आहे. यावरुन राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलेलं आहे. राज्य सरकारवर विरोधक जोरदार टीका करत आहेत. अशातच आता मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खेड भरणा नाका येथील छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याची उंची महामार्गावरील पुलापेक्षा कमी असल्याने अप्रिय घटना घडू शकते. अशी भीती मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणातील नव्या पुलाच्या उभारणीनंतर आता हा अत्यंत महत्वाचा असलेला मुद्दा समोर आला आहे.

मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक सुरू असते. भरणे नाका येथील पुलाच्या बाजूलाच छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. मात्र, आता महाराजांच्या पुतळ्याची एकतर उंची वाढवावी किंवा हा पुतळा येथून स्थलांतरित करून खेड नगरपरिषद हद्दीत लावावा. अशी मागणी मनसेचे राज्य सरचिटणीस खेडचे माजी नगराध्यक्ष



वैभव खेडेकर यांच्याकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. त्याचबरोबर संबंधित अधिकाऱ्यांनाही अशा स्वरूपाचे निवेदन देण्यात आले आहे.

# विधानसभेसाठी महायुतीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला

**नागपूर :** लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका बसला. महायुतीमधील अनेक दिग्गज उमेदवारांना पराभवाचा सामाना करावा लागला. तर दुसरीकडे महाविकास आघाडीनं मात्र राज्यात जोरदार मुसंडी मारल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान आता विधानसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. विधानसभा निवडणुकीचं वारं जोरदार वाहू लागलं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शनिवारी महायुतीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नेमकं काय म्हणाले बावनकुळे?

'काल महायुतीची बैठक झाली, जागा वाटपाबाबत काही चर्चा झाली. पुढच्या दहा दिवसांत १० तारखेपर्यत जागा वाटपाची चर्चा पूर्ण होईल. पत्रकार परिषद घेऊन आमचे नेते जागा वाटप जाहीर करतील. काही जागा वाटपाबाबत आमचं एकमत झालं आहे. आम्ही कुठलीही आकडेवारी मांडली नाही, जो जिंकेल त्याला ती जागा देण्याचा निर्णय झाला आहे. महायुतीच्या मित्रपक्षांनाही जागा देण्याबाबत चर्चा झाली आहे, असं बावनकुळे यांनी म्हटलं आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की जागा किती कोणाला मिळाव्या हे महत्त्वाचं नाही. राज्यात आमच्या योजना पुढे नेण्यासाठी महायुतीचं डबल इंजिनचं सरकार हवं आहे. आमचा जागेसाठी आग्रह नाही तर जिंकण्यासाठी प्राथमिकता आहे. महायुतीला १३ मित्र पक्ष आहेत, जागा वाटपात त्यांचाही विचार होणार आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# राज्य शासनाकडून सहकारी साखर कारखान्यांना नेहमीच सहकार्य राहील

## पालकमंत्री शंभूराज देसाई : देसाई कारखान्याचे चांगल्या कामकाजाबद्दल केले कौतुक : लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी कारखान्याची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**पाटण** : लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याच्या उत्तम नियोजनामुळे विस्तारीकरण चे दोन्ही टप्पे पूर्ण झाले असून गत वर्षीचा गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडला आहे. राज्यातील सहकारी साखर कारखानदारीपुढे अनेक समस्यांचा असून या समस्यांवर मात करण्यासाठी राज्य शासनाकडून सहकारी साखर कारखान्यांना नेहमीच सहकार्य राहिल असे प्रतिपादन राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाणे आणि सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार शंभूराज देसाई यांनी केले.

दौलतनगर ता. पाटण येथे लोकनेते बाळासाहेब देसाई कारखान्याच्या ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी लोकनेते बाळसाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई, व्हाईस चेअरमन पांडूरंग नलवडे डॉ. दिलीपराव चव्हाण, अशोकराव पाटील, शशिकांत निकम, सोमनाथ खामकर, प्रशांत पाटील, बळीराम साळुंखे, शंकरराव पाटील, विजय सरगडे, सर्जेराव जाधव, सुनिल पानस्कर, भागोती शेळके, बबनराव शिंदे, लक्ष्मण बोर्गे, सौ.दिपाली पाटील, जयश्री कवर, विजय पवार, विजय पानस्कर, बाळासाहेब पाटील, विलास गोंडाबे, पंजाबराव देसाई विजयराव जंबुरे, अभिजित पाटील, डी. पी. जाधव, मलिंद पाटील, शिवदौलत सहकारी बँकेचे चेअरमन संजय देशमुख, प्रकाशराव जाधव, आर. बी. पवार यांचेसह संचालक मंडळाची प्रमुख उपस्थिती होती.


**दौलतनगर** : लोकनेते बाळासाहेब देसाई कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना ना. शंभूराज देसाई समोर उपस्थित जनसमुदाय

पालकमंत्री ना. शंभूराज देसाई म्हणाले की ''पाटण विधानसभा मतदारसंघाची भौगोलिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल असून विहिरीवरचे तसेच कोयना काठ सोडला तर ऊसाचे बारमाही क्षेत्र नव्हते. लोकप्रतिनिधी म्हणून कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ऊसाचे क्षेत्र वाढविण्याबरोबर कारखाना कार्यक्षेत्रामध्ये जादा ऊस उपलब्ध होण्यासाठी शासनाच्या माध्यमातून उपसा सिंचन योजना मंजूर करुन त्या पूर्णत्वाकडे नेण्यासाठी प्रयत्नशिल राहिलो. तारळे विभागात ५० मीटर हेडवर शेतीला शासन खर्चाने पाणी देण्याचा निर्णयात बदल करुन १०० मीटर हेडपर्यंत शेतीला पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता घेत तारळे धरण प्रकल्पांतर्गत पाच उपसा सिंचन योजनांची कामे सध्या पूर्णत्वाकडे जात आहेत. तर मोरणा गुरेघर बंदिस्त पाईप लाईनच्या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून नाटोशी उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. तर तारळी पॅटर्ननुसार मणदुरे विभागातील साखरी,चिटेघर व निवकणे प्रकल्पातील पाणी १०० मीटर हेडवरील शेतीला देण्याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनानुसार याचाही प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु असून या योजना पूर्ण झाल्यानंतर कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली येऊन कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस आपल्या कारखान्याला गळीतास येऊन याचा फायदा आपल्या कारखान्याला होणार असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले की, कारखान्याची प्रगतीसाठी आर्थिक शिस्त गरजेची असून आपल्या कारखान्याने विस्तारवाढ करण्याचे काम करताना चांगले आर्थिक नियोजन केल्याने लवरक विस्तारीकरणाचे काम पूर्ण झाल्याने कमी कालावधीमध्ये गळीत हंगाम पूर्ण होऊन खर्चाची बचत झाली. दरम्यान भविष्यामध्ये कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ऊसाचे उत्पादन वाढणार असल्याचे लक्षात घेऊन आपल्या कारखान्याने इथेनॉल प्रकल्पाचे उभारणीचे कामही भविष्यात हाती घ्यावे, राज्य सरकार नेहमीच पाठीशी ठामपणे उभे राहिल,असे सांगत ते पुढे म्हणाले की, अडीच वर्षांपूर्वी राज्यात शिवसेनेच्या राजकीय उठावाच्या आमच्या भूमिकेसंदर्भात अनेक जण शासंक होते मात्र खऱ्या अर्थाने आम्ही सत्तेसाठी नव्हे,अथवा पदासाठी नव्हे तर मतदारसंघातील रखडलेल्या विकास कामांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी पाठीशी ठाम राहिलो आणि त्याचा परिणाम आजपर्यंत मतदारसंघात कधी झाला नव्हता एवढा प्रचंड विकास गेल्या अडीच वर्षात झाला याचा आपणाला अभिमान असल्याचे सांगून राज्य शासनाच्या माध्यमातून पाटण विधानसभा मतदारसंघामध्ये विविध योजनांमधून विकास कामे सध्या मार्गी लावत आहेत. यामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पहिले प्रशिक्षण केंद्र वाटोळे या ठिकाणी होत आहे. तर कोयनानगर याठिकाणी राज्य आपत्ती दल व पोलीस प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार असून रासाटी हेळवाक येथील जल पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगारा निर्मितीस जलपर्यटनाचा चांगला प्रकल्प मार्गी लागणार आहे. सातारा जिल्हयाचा पालकमंत्री म्हणून शासनाच्या विविध योजना मतदारसंघामध्ये राबविण्यात तुम्हा सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झालो असल्याचे सांगत कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस अन्यत्र जाऊ नये यासाठी संचालक मंडळ व ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांनी सांघिक प्रयत्न करावेत असे त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

कारखान्याचे चेअरमन यशराज देसाई म्हणाले की, यावर्षीपासून सर्व शेतकरी सभासद यांच्या सहकार्याने तसेच या जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली दोन गळीत हंगामाध्ये कमी खर्चामध्ये कारखान्याची क्षमता वाढ करत गळीत हंगाम यशस्वी केला. विस्तारवाढीमुळे कारखान्याचा गतवर्षीचा गळीत हंगाम ७१ दिवसांत झाला. कमी दिवसाच्या गळीत हंगामामुळे अन्य खर्चामध्ये मोठी बचत झाली. मात्र गेली अनेक वर्षापासून साखरेच्या किमान विक्रीच्या आधारभूत किंमतीमध्ये वाढ झाली नसल्याने शेतकऱ्यांना ऊस दर देण्यात मोठी अडचण येत आहे. तरीही आपण ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांना जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न करत आहोत. कारखान्याने भविष्यात चांगले आर्थिक नियोजन केले आहे. दरम्यान राज्य शासनाने आपल्या साखर कारखान्याला बिनव्याजी आर्थिक सहाय्य केल्यामुळे व्याजाची रक्कम वाचली त्याबद्दल राज्यशासनाचे आभार मानत ते पुढे म्हणाले की, गत गळीत हंगामामधील ऊसाची एफ.आर.पी.ची उर्वरित देय रक्कम लवकरच ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांचे खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे सांगत कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस अन्यत्र जाण्याच्या प्रमाणामध्ये गत गळीत हंगामाध्ये घट झाली असून कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक सभासद व शेतकरी यांनी आपला पिकविलेला संपूर्ण ऊस कारखान्यास गळीतास देण्याचे आवाहन त्यांनी शेवटी केले.

अशोकराव पाटील यांनी प्रास्ताविक स्वागत केले.नोटीस वाचन कार्यकारी संचालक सुहास देसाई यांनी केले.अहवाल वाचन वैभव जाधव यांनी केले. विषयपत्रिकेवरील सर्व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येऊन लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. तर बबनराव शिंदे यांनी आभार मानले.

# कराडात शिवभक्त महेश करचे यांचे दत्त चौकापासून स्व. चव्हाण समाधीस्थळापर्यंत अनोखे आंदोलन

**कराड** : मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा कोसळला. या प्रकरणी स्वतः ला मनस्ताप करीत कराडमध्ये शिवभक्ताने नाक घासले. राज्यकर्त्यांचा नाकर्तेपणावर नाराजी व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यापासून स्वर्गीय यशवंतराव चव्हाण समधीस्थळापर्यंत अनोखे आंदोलन केले. राज्यकर्त्यांना सुबुद्धी द्यावी अशी अपेक्षाही समाधीस्थळी व्यक्त केली.


**कराड** : नाक घासून आंदोलन करताना महेश करचे

शनिवारी महेश करचे हा शिवभक्त आपल्या कार्यकर्त्यांसह येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यानजीक जमा झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा ते प्रीतिसंगमावरील यशवंतराव चव्हाण समाधी स्थळापर्यंत दंडवत घालत व नाक घासत शिवभक्तांने मनस्ताप केला. वाऱ्याच्या वेगामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला अशी आरव सरकारने उठवली आहे. दरम्यान महेश करचे यांनी याचे खंडन करून वाऱ्याचा वेग इतका होता तर परिसरातील घरावरचे पत्रे, कौले उडाले नाहीत अथवा कोणतेही दुर्घटना घडली नाही. याचा अर्थ पुतळा बनवणाराने व्यवस्थित पुतळा तयार केला नाही. सरकार आणि प्रशासनाने याचे गांभीर्याने तत्कालीन परिस्थितीत दखल घेतली नाही. अशी प्रतिक्रिया महेश करचे यांनी व्यक्त केली आहे.

# रेठरे बुद्रुकच्या पर्यटन वाढीला चालना देण्यासाठी प्रयत्न करणार

## डॉ. सुरेश भोसले : घाट व पायऱ्या बांधकामासाठी एक कोटींचा निधी मंजूर

**कराड** : संथ वाहणारी कृष्णा नदी, नैसर्गिक सौंदर्य लाभलेला परिसर आणि गावातील मंदिरांच्या देखण्या वास्तू असा वैविध्याने नटलेला परिसर लाभणे हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे. कृष्णानदीच्या काठी संरक्षण भिंतीचे काम होत असताना, रेठरे बुद्रुकच्या पर्यटनवाढीला चालना देण्यासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांनी दिली.

रेठरे बुद्रुक (ता. कराड) येथील सुकन्या राज्यसभेच्या माजी खासदार वंदना चव्हाण यांच्या विशेष फंडातून नदीकडे जाणाऱ्या रस्त्यावरती घाट व पायऱ्या बांधकामासाठी तब्बल १ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. या कामाच्या भूमीपूजनप्रसंगी ते बोलत होते.


**रेठरे बुद्रुक** : कृष्णा नदी घाट बांधकामाच्या शुभारंभप्रसंगी डॉ. सुरेश भोसले, आदित्य मोहिते, हणमंत सुर्यवंशी व इतर.

यावेळी युवा नेते आदित्य मोहिते, सरपंच हणमंत सूर्यवंशी, उपसरपंच भाग्यश्री पवार, सोसायटीचे चेअरमन व्ही. के. मोहिते, माजी जि. प. सदस्य शामबाला घोडके, माजी सरपंच सुवर्णा कापूरकर, बबन दमामे, माजी उपसरपंच शिवाजीराव दमामे, सुनिल पवार, जयवंतराव साळुंखे, राजीव मोहिते, बाळासाहेब मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. भोसले पुढे म्हणाले, गावातील सांडपाणी, घनकचरा यावर प्रक्रिया करून त्याचा पुर्नवापर करण्यासाठी योजना हाती घेणे गरजेचे आहे. त्याशिवाय बंद झालेली सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांची परंपरा सुरू करण्यासाठी त्या-त्या क्षेत्रातील लोकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. गावाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करुया.

यावेळी हणमंत सूर्यवंशी, व्ही. के. मोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संजय पवार, आबा मोहिते, बापूराव मोहिते, राहुल मोहिते, एम. के. मोहिते, विलास धर्मे, संजीवनी कार्वेकर, मंथन शेवाळे यांच्यासह ग्रा. पं. व सोसायटी सदस्य, ग्रामस्थ, कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. रामभाऊ सातपुते यांनी सूत्रसंचालन केले. संतोष मोहिते यांनी आभार मानले.

# डॉ. संदीप डाकवे यांचा ''एक अक्षरगणेशा रुग्णांसाठी'' उपक्रम

**तळमावले** : पाटण तालुक्यातील डाकेवाडी (काळगांव) येथील संवेदनशील अक्षरगणेश कलावंत शेतीमित्र डॉ.संदीप डाकवे यानी ''एक अक्षर गणेशा रुग्णांसाठी'' हा उपक्रम राबवला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी डॉ.संदीप डाकवे यांच्याकडून आपल्या आवडीच्या नावाचा अक्षरगणेशा रेखाटून घ्यायचा त्या बदल्यात त्यांना रु.२००/- चे मूल्य द्यायचे आहे. हे मूल्य गरीब, गरजू रुग्णांसाठी देण्यात येणार आहे. यामुळे आपणास अक्षरगणेशा मिळेलच परंतू

गरजूंना मदत केल्याचे समाधानही मिळेल. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम आयोजित केला आहे. ७ सप्टेंबरला लाडक्या गणरायाचे आगमन होत आहे. मंगळवार दि.१७ सप्टेंबर, २०२४ अखेर हा उपक्रम चालणार आहे. डॉ. डाकवे यांनी अक्षरगणेशातून मदत केलेल्या उपक्रमाचे हे ८ वे वर्ष आहे. डॉ.संदीप डाकवे हे गेली सुमारे १९ वर्षापासून अक्षरगणेशा उपक्रम राबवत आहेत. हा उपक्रम स्पंदन चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने राबवण्यात आला आहे. ''एक अक्षरगणेशा रुग्णांसाठी'' या उपक्रमात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे असे आवाहन स्पंदन चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक/अध्यक्ष डॉ.संदीप डाकवे (मो.९७६४०६१६३३) यांनी केले आहे.

# संगमनगर धक्का येथे खड्ड्यात बसून आरती करणार : कांबळे

**पाटण** : पाटण ते संगमनगर रस्ताच वाहतुकीसाठी अयोग्य असलेनं बुधवार दि. ४ रोजी संगमनगर धक्का येथे खड्ड्यात बसून आरती करण्याचा इशारा पंचायत समिती सदस्य बबनराव कांबळे ज्यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. पाटण ते संगमनगर (धक्का) रस्त्याच्या दुरावस्था विरोधात दि. ६ ऑगस्ट रोजी रास्तारोको आंदोलन केले होते. या आंदोलना दरम्यान राष्ट्रीय महामार्ग विभागाने खड्डे भरून पंधरा दिवसात मशिनरी आणुन तात्काळ रस्ताचे काम सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र महामार्ग विभागाने भरलेले खड्डे पुन्हा उद्ध्वस्त होऊन संपूर्ण रस्ताच वाहतुकीसाठी अयोग्य झाला आहे. त्यामुळे बुधवार दि. ४ रोजी संगमनगर धक्का येथे खड्ड्यात बसून आरती करू.तद्नंतर होणाच्या परिस्थितीत संबंधित विभाग जबाबदार राहिल, असा इशारा कोयना विभागाच्यावतीने पंचायत समिती सदस्य बबनराव कांबळे ज्यांनी लेखी निवेदनाद्वारे प्रांताधिकारी सोपानराव टोणपे व तहसीलदार अनंत गुरव याना दिला आहे. निवेदनात म्हटले आहे, कराड ते चिपळूण महामार्गाच्या रस्ता रूंदीकरणाच्या रखडलेल्या कामा संदर्भात व खड्ड्यासंदर्भात गेली ८ वर्षापासून लढा देत आंदोलन करत आहोत.त्यातच पाटणपासून ते कोयनानगर पर्यंत रास्ताचे रूंदीकरण तर बाजूलाच राहिले. मात्र रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून रस्ताच वाहतुकीसाठी अयोग्य बनला आहे.मात्र राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला कसलेही सोयरसुतक नसल्याचे दिसत आहे. या संदर्भात दि. ६ ऑगस्टला कोयना विभागातील ग्रामस्थानी संगमनगर (धक्का) येथे रास्तारोका आंदोलन केले होते. रस्ते विभागाने पंधरा दिवसात मशिनरी आल्यानंतर काम तात्काळ सुरू करू, असे आश्वासन दिल्याने राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सातारा यांच्याकडून आंदोलन स्थगीत करण्याची विनंती केली होती. त्यामुळे आंदोलन मागे घेतले होते. तद्नंतर संबंधित ठेकेदाराने खड्डे भरण्याचे काम हाती घेतले होते. मात्र दोन दिवस जोरदार पर्जन्ङ्मवृष्टी झाल्याने पुन्हा खड्ड्यातील मातीमिश्रीत खडी बाजूला होवून पुन्हा जैसे थे खड्डे झाले आहेत. याउलट संपूर्ण रस्तावर खडी पसरल्याने चारचाकी वाहनांसह दुचाकी वाहनेही घसरू लागले आहेत.अनेक आंदोलने करूनही संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना काहीच पडलेले नाही. सर्वसामान्यांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे.काही दिवसात गणपतीचे आगमन होणार आहे. चाकरमानी गणेशोत्सवाला कोयना विभागात दाखल झाले आहेत. गणपतीमूर्ती आणताना खड्ड्यामुळे दुर्घटना होऊन पावित्र्य धोक्यात आल्यास त्यास सर्वस्वी ठेकेदार व अधिकारीच जबाबदार असतील. गणेश आगमनापूर्वी रस्त्याचे काम सुरू होईल असे वाटत नाही. त्यामुळे बुधवार दि. ४ पासून संगङ्क संगमनगर (धक्का) येथे खड्ड्यात बसूनच आरतीचे नियोजन केले असल्याचे निवेदनात बबनराव कांबळे यांनी नमुद केले आहे.

निवेदनावर बबनराव कांबळे, माजी सभापती राजाभाऊ शेलार, सामाजिक कार्यकर्ते पंकज गुरव, बाळासाहेब कदम, डी. पी. कदम, मंगल माने, संजय कांबळे, प्रदीप कांबळे, रविंद्र कांबळे, दिलीप कदम, सागर गायकवाड आदींच्या सह्या आहेत.


**आर्वी** : बंदिस्त गटर व रस्ता कॉंक्रिटीकरण कामाच्या भूमिपूजनप्रसंगी धैर्यशील कदम, मनोज घोरपडे, भीमराव पाटील व इतर

# आर्वीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : धैर्यशील कदम

**पुसेसावळी** : कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाला आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाणसाहेब यांनी स्वतः च्या तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले सत्तेचे विकेंद्रीकरण काय असते याचा वस्तुपाठच त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून दिला परंतु त्यांच्या पश्चात सर्व पदे एकाच घरात वंशपरंपरेने घेऊन कराड उत्तर विधानसभा मतदारसंघ विकासाच्या बाबतीत ५० वर्षे पाठीमागे नेण्याचे काम विद्यमान आमदारांनी केले आहे. स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांचा वसा आणि वारसा आम्ही पुढे चालवू या मतदारसंघातील कोणते गाव विकासापासून वंचित ठेवणार नाही, आर्वीच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे अशी ग्वाही भाजपा सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम यांनी दिली.

आर्वी ता. कोरेगाव येथे जिल्हा नियोजन मंडळ सातारा लेखाशीर्ष ५०५४ मधून भाग आर्वी साठेवाडी रस्त्यामधील (तिकाटणे ते रिकामटेकवडी) रस्त्यास बंदिस्त गटर व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे २५ लक्ष रुपये या कामाचा भूमिपूजन सोहळा तसेच बांधकाम कामगार योजना नोंदणी उपक्रम संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कराड-उत्तर निवडणूक प्रमुख मनोज घोरपडे, रहिमतपूर मंडल अध्यक्ष भीमराव पाटील, युवा नेते अनंत साबळे, किसन निकम, सरपंच योगेश उबाळे, महेश उबाळे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

धैर्यशील कदम पुढे म्हणाले, आगामी विधानसभा निवडणुकीत कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्य जनतेचे आशीर्वाद व मतदार संघातील जनतेच्या पाठिंब्यावर भाजपाचा आमदार निवडून येणार आहे

यावेळी मनोज घोरपडे व भीमराव पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी सुनील कांबळे, चेअरमन पवन जाधव, विकास गायकवाड, नारायण पवार काका, गुलाब निकम, बांधकाम विभागाचे उमेश गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य विकास राऊत, माजी सरपंच संजय पाटील, उपसरपंच प्रकाश पाटील, ज्येष्ठ नेते दिलीप दळवी, उपसरपंच पंकज पवार, सरपंच सविता राऊत, उपसरपंच अल्पना पवार, संगीता डोंबे, संचालक विकास जाधव, ज्येष्ठ नेते बाळासो यादव, बाळकृष्ण यादव, सतीश यादव, मारुती जाधव, विठ्ठल पवार, अथर्व डोंबे यांचेसमवेत आर्वी गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कदम महाविद्यालयात शिष्यवृत्ती मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

**कडेगाव, दि. १** : भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महाविद्यालय कडेगाव व महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभाग सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या विविध शिष्यवृत्तीची माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभाग सांगली येथील सहाय्यक संचालक धनश्री भांबुरे या प्रमुख पाहुण्या तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे हे अध्यक्ष होते.

कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालिका धनश्री भांबुरे यांनी महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार यांच्या मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती यांच्या विषयी माहिती दिली. तर शरद यटम या शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असलेली पात्रता आणि त्याविषयी अर्ज सादर करण्याची पद्धत याविषयी सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी एससी, एसटी, एनटी, आणि ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक दृष्टीकोनातून या शासनाच्या विविध शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.


**कडेगाव** : येथे मार्गदर्शन करताना धनश्री भांबुरे व्यासपीठावर प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आणि इतर मान्यवर

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. रमेश जाधव यांनी केले. यावेळी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे प्राथमिक आश्रम शाळा ढगेवाडी ता. वाळवा आणि एस. के. माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा जखाईवाडी ता. वाळवा या दोन आश्रम शाळेतील मुख्याध्यापक व त्यांचे सहकारी यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील तसेच कडेगाव तालुक्यातील विविध माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेचे संयोजन महाविद्यालयातील बी.सी. सेल विभागाचे समन्वयक डॉ. सुनील लोंढे आणि त्यांचे सहकारी यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार कनिष्ठ विभाग प्रमुख मीनाक्षी पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. वहिदा शेख आणि प्रा. अंजली थोरात यांनी केले.

# 'सगाम'च्या छात्र सैनिकांची निवड

**कराड** : येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजच्या १९ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. कराडमधील छात्र सैनिक सिनियर अंडर ऑफिसर साईश हणमंत जाधव व कॅडेट समृद्धी नितीन माळी यांची एन. सी. सी. मधील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या ऑल इंडिया थल सैनिक कॅम्प, नवी दिल्ली २०२४ साठी निवड झाली आहे. या कॅंपसाठी हे दोघेही एन. सी. सी. निदेशालय महाराष्ट्रचे प्रतिनिधित्व करणार आहेत. साईश जाधव आरोग्य व स्वच्छता टीममधून, तर समृद्धी माळी ओबस्टॅकल टीममधून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

# शिरोळ विधानसभे करता दिग्गजांची मोर्चेबांधणी निवडणूक तुल्यबळ होणार

## .तर महिला रणरागिनी विधानसभेच्या मैदानात उतरण्याची शक्यता ?




**जयसिंगपूर :** शिरोळ तालुक्यात सध्या विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहत आहेत. सत्ता संघर्षाच्या पटलावर सध्या विद्यमान आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, दत उद्योग समूहाचे प्रमुख उद्यान पंडित गणपतराव पाटील, गुरुदत्त चे चेअरमन माधव घाटगे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी, माजी आमदार उल्हास पाटील त्यांची नावे समोर येत असली तरी ही निवडणूक तुल्यबळ होणार आहे. दरम्यान उद्यान पंडित गणपतराव पाटील यांनी जरी ऐनवेळी वेगळा निर्णय घेतला तर तालुक्यात महाविकास आघाडीच्या महिला रणरागिणींची नावे समोर येण्याची शक्यता आहे.

सध्या शिरोळ तालुक्यात एकनाथ शिंदे गटाकडून चंद्रकांत मोरे हे विधानसभा निवडणुकीचा आढावा घेत आहेत. बऱ्यापैकी उमेदवारी मिळाल्याचे त्यांनी सांगितले असून त्या दृष्टीने काम सुरू केले आहे. आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांची भूमिका अद्यापही गुलदस्तात असून जनता दरबार भरून जनता सांगेल तो निर्णय घेणार असल्याचे त्यांनी नुकतेच स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर भाजपकडून गुरुदत्तचे चेअरमन माधवराव घाटगे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांचेही नाव मतदार संघात घेतले जात आहे.

राहिला प्रश्न महाविकास आघाडीचा या आघाडीच्या माध्यमातून सध्या गणपतराव पाटील यांचे नाव चर्चेत आहे. जागा शिवसेनेची असल्याने उल्हास पाटील यांनी ही तयारी सुरू केली आहे. हे जरी खरे असले तरी गणपतराव पाटील त्यांच्या निर्णयावरच बरेच अवलंबून आहे. योग्य वेळी निर्णय बदलला तर महाविकास आघाडीला महिला रणरागिनींशिवाय पर्याय राहणार नाही.

सध्या शिरोळ तालुक्यात तालुका काँग्रेसच्या महिला अध्यक्षा मीनाज जमादार, शिवसेनेच्या मंगलताई चव्हाण यांचेही काम तालुक्याने जवळून पाहिले आहे. त्याचबरोबर पद महिन्यानंतर कमी कालावधीत सर्वसामान्य जनतेबरोबर नाळ निर्माण केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या महिला तालुकाध्यक्षा स्नेहा देसाई यांचे काम खासदार व महिला नेत्या सुप्रियाताई सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे. राजकीय क्षेत्राबरोबर सामाजिक क्षेत्रात ही त्यांनी वेगळा ठसा उमटवला असल्याने महिला रणरागिणींच्यामध्ये स्नेहा देसाई यांचे सासरे रामचंद्र देसाई व पती वसंतराव देसाई यांनी आजपर्यंत बहुजन समाजाचा वारसा जपला आहे. त्यामुळे स्नेहा देसाई यांनीही आजपर्यंत बहुजन समाजाचा विचारातून त्यांची वाटचाल सुरू आहे, त्यामुळे त्या महाविकास आघाडी पुढे सक्षम उमेदवार म्हणून पर्याय ठरू शकतात. राजकीय पटलावर महिलांना उभे करण्याचा निर्णय झाला तर राष्ट्रवादीला संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# वीज वितरणच्या उच्च दाबाने संभाजीनगर मध्ये लाखोंची उपकरणे जळाली

**कोरेगाव :** शहरातील उपनगर असलेल्या छत्रपती संभाजीनगर मधील वीज वितरणच्या वाहिनी मध्ये अचानक उच्च दाब निर्माण होवून २२ ग्राहकांची मोठी वीज उपकरणे तर १९ ग्राहकांची छोठी उपकरणे जळून लाखो रुपयांचे नुकसान झाले.

शुक्रवारी सकाळी आठ वाजता ही घटना घडली असून संभाजीनगर मध्ये मध्य वस्तीत असलेल्या वीज सयंत्रामध्ये बिघाड निर्माण होवून बऱ्याच ग्राहकांची टी.व्ही., फ्रिज, वॉशिंग मशिन, गिझर, इस्त्री अशी अनेक घरगुती उपकरणे मोठा आवाज होवून जळून गेली, अचानक झालेल्या घटनेने विशेषतः महिलांमध्ये भीती निर्माण झाली. स्थानिक नागरिकांनी वीज वितरणला घटनेची माहिती दिल्यानंतर वीज वितरणचे कोरेगांव उपविभागाचे सहाय्यक अभियंता अनिल यादव, कर्मचारी राहुल तिवाटणे, शशिकांत पवार, राधेश्याम पाटील, अलका रोडे, वैभव शेटे हे घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान छत्रपती संभाजीनगर मध्ये झालेल्या घटनेनंतर तातडीने दुरुस्ती व नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष नामदार महेशदादा शिंदे यांनी संबंधित विभागाला दिले. त्यानंतर वीज वितरण कर्मचाऱ्यांनी वीज सयंत्र तातडीने दुरुस्त केला. झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून वीज विभागाला अहवाल देण्यात येईल असे सहाय्यक अभियंता अनिल यादव यांनी नागरिकांना सांगीतले.

# डॉल्बीत आडकले तिनशे पन्नास तरुण

## शंभर वाहने, सर्वांचे भवितव्य धोक्यात

**पन्हाळा :** गेल्या काही वर्षांपासून सर्वच सण समारंभात डॉल्बी लावण्याचे प्रमाण वाढतानाच दिसत आहे. याबाबत पोलीस प्रशासनाकडून मंडळाच्या बैठका घेऊन वारंवार जनजागृती केली जाते पण काही मंडळे त्याला न जुमानता मिरवणुकीत डॉल्बी लावतात. विशेष करून गणेश उत्सवात डॉल्बीचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.त्यामुळे पोलीस प्रशासनाने याबाबत ठोस उपाययोजना करणेसाठी निर्णायक पावले उचलत डॉल्बी लावणाऱ्या मंडळाच्या पदाधिकाऱ्यां विरोधात ध्वनी प्रदूषण केल्याचे कोर्टात दावे दाखल करण्यात आले असून पन्हाळा तालुक्यातील चौतीस मंडळावर कोर्टात दावे दाखल झाले आहेत. यात तिनशे पन्नास तरुण व शंभर वाहतूक वाहने यां सर्वांचे भवितव्य धोक्यात आले आहे.

पोलीस उपविभागीय अधिकारी शाहूवाडी विभाग कार्यालया कडून विभागातील सर्व पोलीस ठाण्यांना मिरवणुकीत होणाऱ्या डॉल्बी वापरा बाबत सूचना दिल्या होत्या.त्यासानुसरून पोलिसांनी पन्हाळा तालुक्यात रबविलेल्या मोहिमेत पन्हाळा तालुक्यातील चौतीस सार्वजनिक तरुण मंडळानी डॉल्बी लावून ध्वनी मर्यादेचे उल्लंघन केलेचे निदर्शनास आले होते.त्याबाबत तालुक्यातील सर्व पोलीस ठाण्याकडून सविस्तर अहवाल उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे पाठवला होता. अहवालनुसार सर्व दोषी चौतीस मंडळाना नोटीसा लागू करण्यात आल्या होत्या. पण मंडळानी त्याबाबत पोलीस उपविभागीय अधिकारी यांचेकडे कोणताच खुलासा दिला नाही. त्यामुळे पोलीस उपविभागीय अधिकारी यांनी सर्वच दोषी आढळलेल्या चौतीस मंडळावर कोर्टात दावा दाखल केला आहे. हा दावा सर्व मंडळातील प्रमुख कार्यकर्त्यांसह प्रत्येक मंडळातील दहाजण यांचे वर झाला आहे. यातील बहुतांश कार्यकर्ते युवा असून त्यांचेवर गुन्हा शाबीत झाला तर त्यांना भविष्यात अनंत अडचणींना तोड द्यावे लागणार आहे. त्यामुळे यापुढे कोणत्याही उत्सवात डॉल्बी लावताना राजकीय प्रतिष्ठेला बळी न पडता. सर्वच मंडळानी कार्यकर्त्यांच्या भविष्याचा, गावातील जेष्ठ नागरिक, लहानमुले, आजारी व्यक्ती यांचा विचार जरूर करावा.

### कोर्टात दावा दाखल झालेली गाव निहाय मंडळे

**पन्हाळा पोलीस ठाणे हद्दीतील कोतोली येथील नव जीवन तरुण मंडळ, झोन ग्रुप, राधा कृष्ण तरुण मंडळ, शिवशक्ती तरुण मंडळ, अष्टविनायक तरुण मंडळ, राजा शिव अधिकारी तरुण मंडळ, जय हनुमान तालीम मंडळ,श्री गणेश तरुण मंडळ, शिवाजीनगर तरुण मंडळ या नऊ मंडळावर व आसुर्ले येथील टायगर तरुण मंडळ, छत्रपती शिवाजी फ्रेंड सर्कल, छत्रपती शिवाजी तरुण मंडळ, संयुक्त माळवाडी तरुण मंडळ,या चार मंडळावर तसेच राक्षी येथील जय शिवराय तरुण मंडळ व संजय फ्रेंड सर्कल या दोन मंडळावर तसेच मोरेश्वर व्यापारी तरुण मंडळ पोर्ले,मृत्युंजय ग्रुप पन्हाळा, ओम साई तरुण मंडळ,माळवाडी अशी एकूण आठरा मंडळावर कार्यवाही झाली आहे तर कोडोली पोलीस ठाणे हद्दीतील बहिरेवाडी येथील एक व कोडोली येथील बारा अशा एकूण तेरा मंडळावर कार्यवाही करण्यात आली कळे पोलीस ठाणे हद्दीतील बछडा ग्रुप बाजार भोगाव, जय शिवराय कला व क्रीडा सांस्कृतिक तरुण मंडळ, मरळी दत्त तरुण मंडळ, वारनुळ अशा एकूण तीन मंडळावर कार्यवाही करण्यात आली.**

### स्पर्धा टाळवी

**राज्यात विधानसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत त्यामुळे यावर्षीच्या गणेश उत्सवात सजावटी बरोबरच मिरवणुकीतडॉल्बी लावण्या वरून स्पर्धा या होणारच आहेत पण मंडळानी आपल्या उमेदवाराचे समर्थन करताना कार्यकर्त्यांच्या भविष्याला बाधक ठरणारी स्पर्धा टाळवी**

# विधानसभा निवडणूक जिंकायची आहे

## माजी खा. संजय पाटील यांची घोषणा : आर. आर. पाटील कुटुंबावर विश्वासघाताचा आरोप



**तासगाव :** नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विकासापेक्षा जातीपातीच्या राजकारणामुळे अडचण निर्माण झाली. पण, एका पराभवाने खचून जाणारा संजय पाटील नाही. शिकार करायची असेल तर दोन पावले मागे यावे लागते. ज्यांना आपण सहकार्य केले त्या मंडळींनी अडचणीच्या काळात आपला विश्वासघात केला. आपणास अडचणी निर्माण केल्या. मात्र दोन महिन्यात पुन्हा विधानसभा निवडणुका आहेत. ही निवडणूक आपणाला जिंकायची आहे, अशी घोषणा माजी खासदार संजय पाटील यांनी केली.यावेळी स्व. आर. आर. पाटील कुटुंबाचे नाव न घेता त्यांच्यावर विश्वासघाताचा आरोप त्यांनी केला.

येथील दत्तमाळावर आयोजित प्रभोदय दहीहंडीच्या निमित्ताने ते बोलत होते. ही दहीहंडी फोडण्याचा मान तासगावच्या शिवनेरी गोविंदा पथकाने मिळवला. यावेळी माजी खासदार संजय पाटील म्हणाले, तालुक्यातील गोविंदा पथके इतर जिल्ह्यात जाऊन लाखो रुपयांची बक्षिसे मिळवत आहेत. या पथकांचे कौतुक केले पाहिजे, या उद्देशाने प्रभोदय दहीहंडी सोहळा घेतला आहे.

ते म्हणाले, जिल्ह्यातील जनतेने आजपर्यंत मला सहकार्य केले आहे. लोकांची शक्ती, आशीर्वाद, बळाच्या जोरावर मी दोन वेळा खासदार झालो. मात्र नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विकासापेक्षा जातीपातीचे राजकारण झाले. त्यामुळे आपणास अडचणी निर्माण झाल्या. आपण ज्यांना मदत केली त्यांनी या निवडणुकीत आपल्या सोबत विश्वासघात केला. मात्र दोन महिन्यात पुन्हा विधानसभेच्या निवडणुका आहेत. या निवडणुकीत आपण आपली शक्ती, ताकद दाखवून द्यायची आहे. विधानसभा निवडणूक जिंकायची आहे. प्रभाकर पाटील तुमच्यासाठी काम करत आहे.

पाटील म्हणाले, काहींना केवळ मोठे बोलण्याची सवय आहे. हातभर लाकूड आणि दहा हात ढलपी असं सुरू आहे. आपण जिल्ह्यात हजारो कोटी रुपयांची कामे केली. पाणी, रस्ता, रेल्वेचे प्रश्न सोडवले. अनेक रखडलेल्या योजना पूर्णत्वास नेल्या. लोकांनी आशीर्वाद दिले म्हणून हे सर्व करता आले.

उद्याच्या काळात पुन्हा ताकतीने आपणास विधानसभा निवडणूक लढायची आहे. जिंकायची आहे. त्यामुळे दोन महिने ताकदीने काम करूया. तालुक्यात विकासाचे पर्व पुन्हा नव्या पिढीच्या हातात देऊया. गतिमान विकास करूया.

# देशातील पहिले विनामुल्य एच.पी.वी वॅक्सिनेशन शिबिर पसरणीत संपन्न

## इंडियन मेडिकल असोसिएशन व ग्रामपंचायत पसरणी यांच्या संयुक्त विद्यमानाने घडविला आदर्श उपक्रम



वाई : जगात आज मोठ्या प्रमाणात स्त्रिया या सर्वाइकल कॅन्सरच्या बळी होत आहेत. गर्भाशयाच्या पिशवीच्या तोंडावर जो कॅन्सर होतो त्याला सर्वाइकल कॅन्सर असे बोलले जाते जगामध्ये महिलांना सर्वाधिक कॅन्सर होणारा हा आजार. यासाठी जी लस दिली जाते ती खूप महाग आहे व भारत देशामध्ये यापूर्वी बनवली जात नव्हती यासाठी लागणारी लस ही विदेशातून मागवली जायची मात्र नुकतीच सिरम इन्स्टिट्यूट पुणे यांनी या लसीचे उत्पादन आपल्या देशामध्ये सुरू केले आणि ही लस आपल्या देशामध्ये उपलब्ध होण्यास सुरुवात झाली. वय वर्ष ९ ते १४ या वयोगटातील मुलींना ही लस दोन टप्प्यांमध्ये सहा महिन्यांच्या कालावधी मध्ये देण्यात येते. त्याचबरोबर वय वर्ष १५ ते २६ या वयोगटातील मुलींना ही लस तीन टप्प्यांमध्ये देण्यात येते.

पसरणी मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ९ ते १४ या वयोगटातील ४० विद्यार्थिनींना हे लसीकरण सर्व शासकीय परवानगी घेऊन आज देण्यात आले. या लसीकरणासाठी ज्या दात्याने लस उपलब्ध करून दिली त्यांनी आपला नाम उल्लेख करण्यात येऊ नये अशी अट घालून हे लसीकरण तळागाळातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलींना देण्याची अट ही इंडियन मेडिकल असोसिएशन समोर ठेवली त्या अनुषंगाने पसरणी गावातील शेतकरी व सामान्य कुटुंबातील ४० मुलींना हे लसीकरण करण्यात आले व असे लसीकरण करण्याच्या उपक्रम देशात सर्वप्रथम पसरणी ग्रामपंचायत मध्ये करण्यात आला अशी माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनच्या विद्यमान अध्यक्ष श्रीमती मंगला अहिवळे व पसरणी गावच्या विद्यमान सरपंच हेमलता गायकवाड यांनी दिली त्यांच्यासोबत इंडियन मेडिकल असोसिएशनच्या उपाध्यक्ष सौ मेघा घोटवडेकर, कोषाध्यक्ष सौ स्वाती देशपांडे, सेक्रेटरी सौ लता पाटील, कमिटी मेंबर सौ उल्का कदम, सौ प्रज्ञा गायकवाड.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी खच-सोबत समन्वय साधून हा उपक्रम पसरणी गावात होण्यासाठी सर्वाधिक प्रयत्न युवा नेते स्वप्निल गायकवाड यांनी केले व त्यांना शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री अमोल आबा महांगडे, माजी उपसरपंच विशाल शिर्के, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री भांगरे सर व सर्व शिक्षकांनी त्याचबरोबर शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य व पालक यांनी सहकार्य केले.

# नियम पाळून गणेशोत्सव करा

**सातारा :** बोरगाव पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र तेलतुंबडे यांनी घेतली. तेलतुंबडे यांनी नियमावलीबाबत माहिती देवून, त्याचे पालन करण्याच्या सर्वांना सूचना दिल्या. तसेच नियमांचे पालन न केल्यास कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

बोरगाव पोलीस ठाण्यात गणेशोत्सव मंडळांची बैठक घेतली. यावेळी गणेशोत्सव काळात आगमन व विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजे वापर करायचा नाही, लेझर किरणे पाडू नयेत, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, उभारण्यात येणाऱ्या कमानी याची संबंधित विभागाकडून परवानगी घेण्यात यावी, दोन समाजामध्ये तेढ होईल अशी गाणी लावणी, वक्तव्य करण्यात येऊ नये, लावण्यात येणारे फ्लेक्स यावर ती दोन समाजात तेढ निर्माण होईल असे मजकूर किंवा फोटो लावण्यात येऊ नयेत, बांगलादेश, इजराइल, पाकिस्तान येथे घडलेल्या घटना याच्या सोशल मीडियावरती पोस्ट टाकायच्या नाहीत, असा सूचनाही तेलतुंबडे यांनी दिल्या.

गणेशोत्सव काळात सर्व मंडळी हे दिवस-रात्र स्वयंसेवक नेमतील, गावातील सर्व मंडळे एकत्र येऊन गावामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, ज्या ठिकाणी अंधार आहे अशा ठिकाणी सौरऊर्जा दिवे लावणे यासारखे उपक्रम राबवतील, कोणतेही गणेश मंडळ हे सक्तीने गणेश वर्गणी वसूल करणार नाहीत, दोन मंडळी एकत्रित येतील अशा मिरवणुका काढण्यात येऊ नयेत आदींसह विविध सूचना तेलतुंबडे यांनी दिल्या.

# डॉ. भारत पाटणकर यांचा ४ रोजी कोल्हापूरमध्ये कार्य गौरव सन्मानं

सातारा : कष्टकरी चळवळ क्षीण होत असतानाच श्रमिक मुक्ती दलाचे डॉ. भारत पाटणकर हे धरण, दुष्काळग्रस्तांसाठी लढा देत आहेत. ५० वर्षांपासून त्यांचे काम सुरू असून ही एक उद्धत घटना आहे. अशा लढावू नेतृत्वाचा अमृतमहोत्सवानिमित्त ४ सप्टेंबरला कोल्हापुरात कार्यगौरव सन्मान होणार आहे. यासाठी महाराष्ट्रातून लोक येणार आहेत, अशी माहिती डॉ. भारत पाटणकर अमृतमहोत्सवी कार्यगौरव समितीचे अध्यक्ष ॲड. कृष्णा पाटील यांनी दिली.

सातारा येथे शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ॲड. पाटील बोलत होते. यावेळी समितीचे कार्याध्यक्ष कॉ. संपत देसाई, सचिव सुधीर नलवडे, विजय मांडके यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.


कॉ. देसाई म्हणाले, श्रमिक मुक्ती दलाची स्थापना १९८२ ला झाली. डॉ. भारत पाटणकर यांनी ५० वर्षांपासून महाराष्ट्रातील धरणग्रस्त, दुष्काळग्रस्तांसाठी लढे उभे करुन यशस्वीही केले. याचबरोबर त्यांचा सांस्कृतिक चळवळीतही सहभाग राहिला. विद्रोही सांस्कृतिक चळवळीतील त्यांचे योगदानही मोठे आहे. महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक चळवळीचा अभ्यास करताना डॉ. पाटणकर यांना डावलता येणार आहे. असे व्यक्तीमत्व असणाऱ्या डॉ. पाटणकर यांचा अमृतमहोत्सवानिमित्त ४ सप्टेंबरला सकाळी साडे दहा वाजता कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनमध्ये कार्यगौरव सन्मान होणार आहे.

कोल्हापुरातील हा सन्मान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला खासदार छत्रपती शाहू महाराज, खासदार विशाल पाटील, आमदार सतेज पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तर डॉ. गोपाळ गुरू, मनिषा गुप्ते, वाहरू सोनावणे आणि डॉ. जयसिंगराव पवार हे प्रमुख वक्ते असणार आहेत. या कार्यक्रमात सातारा जिल्ह्यातूनही मोठ्या संख्येने धरण आणि दुष्काळग्रस्त सहभागी होणार आहेत, अशी माहितीही कॉ. देसाई यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेत मान्यवरांनी डॉ. भारत पाटणकर यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच वर्षभर महाराष्ट्रात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तर आगामी काळात डॉ. पाटणकर यांच्यावर संदर्भग्रंथ तयार करण्यात येणार आहे. यामध्ये तीन भाग असणार आहेत. 'श्रमिक'चा आढावा, देशातील सामाजिक-आर्थिक चळवळ आणि डॉ. पाटणकर यांचा परिवार व त्यांच्या कार्याचा आढावा यामध्ये असणार आहे. त्याचबरोबर डॉ. पाटणकर यांच्या कार्यावर एक फिल्मही बनविण्याचा विचार आहे, असेही या पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

# सातारा जिल्ह्यात अभया उपक्रमाचा शुभारंभ

**सातारा :** सातारा जिल्हा पोलीस दलाकडून महिलांचे सुरक्षिततेसाठी नाविण्यपूर्ण असा 'अभया' उपक्रम सुरु करण्यात येत आहे. यामध्ये सातारा जिल्ह्यामध्ये ऑटो रिक्षामधून प्रवास करणाऱ्या महिलांना कोणत्याही व्यक्तींकडून असुरक्षितता भासल्यास किंवा महिलांची कोणी छेडछाड केल्या, गैरउद्देशाने पाठलाग केल्यास महिलांना तात्काळ मदत मिळण्यासाठी अभया उपक्रमांतर्गत रिक्षामध्ये क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. यामुळे महिला, युवतींना सुरक्षितता मिळण्यास मदत होणार आहे.




**गौरी, गणपतीच्या खरेदीसाठी साताराची बाजारपेठ फुलली..**

**येत्या सात सप्टेंबर पासून घरोघरी तसेच सार्वजनिक स्वरूपात सुरू होणाऱ्या गणेशोत्सवाची लगबग सातारा शहरात दिसून येत आहे. उत्सवापूर्वीचा रविवार, त्यामुळे महिलांसह पुरुषांनीही गणेश सजावट तसेच गौरीच्या सजावटीसाठी लागणाऱ्या विविध पदार्थांच्या तसेच साहित्याच्या खरेदीसाठी सदाशिव पेठ खणआळी, मोती चौक या भागात प्रचंड गर्दी केली होती .गणपतीसाठी लागणारी मखर ,शोभेच्या फुलांच्या हार, माळा, तोरणे तसेच महिरपी आणि गौरीच्या साठी लागणारे विविध प्रकारचे दाग- दागिने, कंबरपट्टे, मुखवटे, साच्या आधी खरेदीसाठी रविवारी रात्री उशिरापर्यंत खणआळी आणि सदाशिव पेठेचा हा परिसर गर्दीने भरून गेला होता. त्याचीही दृश्य. (फोटो ..अतुल देशपांडे, सातारा.)**